Education and Society
(शिक्षण आणि समाज)

**Special Issue**
UGC CARE Listed Journal
ISSN 2278-6864

# Education and Society

**Since 1977**

**The Quarterly dedicated to Education through Social Development and Social Development through Education**

**July 2023**

**(Special Issue-1/ Volume-IV)**

INDIAN INSTITUTE OF EDUCATION

128/2, J. P. Naik Path, Kothrud, Pune - 411 038

Special Issue
UGC CARE Listed Journal
ISSN 2278-6864

# Education and Society

Since 1977

The Quarterly dedicated to Education through Social Development and Social Development through Education

Special Issue on the theme of
"Emerging Issues in Commerce, Management, Economics, Social Sciences and Languages"
July 2023

(Special Issue-1/ Volume-IV)

Indian Institute of Education
J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38

३२. प्राचीन भारतीय तत्वज्ञान
सौ. मीनाक्षी कुमार भगाटे
167

३३. १६–१८ वयोगटातील मुलांमध्येसमस्या सोडविताना व्यक्तिमत्वावर होणारा परिणाम
जाधव सतिश रजनीकांत
173

३४. भारतीय लोकशाहीतील राष्ट्रीय  भारतीय लोकशाहीतील राष्ट्रीय पक्षांची वाटचाल
श्री. ठोकळ रमेश गणपत, प्रा. डॉ. काळे संजय अंकुश
177

35. आदिवासी लोकसाहित्य आणि समाजजीवन यांचा अनुबंध
प्रा. डॉ. कृष्णा महादू भवारी
186

३६. आजची शिक्षण प्रणाली व युवक
प्रा. डॉ. हरिश्चंद्र गोविंदा बोरकर
192

३७. भारतीय राज्यघटना आणि संयुक्त राष्ट्रांचा आर्थिक सामाजिक, व सांकृतिक हक्कांचा करारनामा १९६६ यातील साम्य - एक समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा. डॉ. अशोक शामराव चव्हाण
195

३८. पं.  मिथिलेश शर्मा यांचे आधुनिक संस्कृत साहित्य प्रकारातील योगदान
डॉ. मृणालिनी आबासाहेब शिंदे
198

३९. भारतीय लोकशाहीचे भवितव्य
डॉ. उर्मिला महेश चव्हाण
205

४०. भारतीय लोक साहित्य
डॉ. मनीषा आझाद नायकवडी
209

४१. पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतीय लोकशाही
प्रा. ए. बी. मोहिते
216

# पं. मिथिलेश शर्मा यांचे आधुनिक संस्कृत साहित्य प्रकारातील योगदान

**डॉ. मृणालिनी आबासाहेब शिंदे**
वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

---

**गोषवारा:**

पं. मिथिलेश शर्मा हे प्रतिभाशाली विद्वान, संशोधक, विविध भाषा व साहित्याचे गाढे अभ्यासक आणि संस्कृतचे आधुनिक कवी आहेत. त्यांना संस्कृतसाहित्यलेखनाची प्रेरणा घरातूनच मिळालेली आहे. विविध प्रकारच्या गुणवत्तापूर्ण व दर्जेदार आधुनिक संस्कृत साहित्यनिर्मितीमुळे त्यांना विविध पुरस्कार आणि सन्मानांनी गौरविण्यात आलेले आहे. त्यांनी कुमार्यम्बा (संस्कृतानुवादित-एकादशैकांकिकासंग्रह:),पं.दीनदयाल उपाध्यायचरितम् (गद्यकृति), स्वातंत्र्यसेनानी गाथा (गद्यकृति), शौर्यगाथा (अमरहुतात्मन: ऊधमसिंहस्य), (गद्यकृति), स्वामि- धर्मदेवचरितम् (खंडकाव्यम्), सुवचांसि (पद्यविधा) भाग-१, सुवचांसि (पद्यपराग) भाग-२, सुवचांसि (सूक्तिमौक्तिकम्) भाग-३, वसंततिलका (मधुशाला-रुबाईयाँ), पद्ममुनि- चरितम् इत्यादी विविध प्रकारच्या दहा आधुनिक संस्कृत साहित्यकृतींची सरल, सुबोध, सोप्या संस्कृतभाषेत निर्मिती करून आधुनिक संस्कृत साहित्यप्रकारात मोलाचे योगदान दिलेले आहे.

---

**महत्त्वपूर्ण बिंदु:** पं. मिथिलेश शर्मा, आधुनिक संस्कृत साहित्य प्रकार, एकांकिका, चरित्र, ललित साहित्य

---

**प्रस्तावना:**

संस्कृत जगातील सर्वात प्राचीन व समृद्ध अशी भाषा आहे. या भाषेला गौरवशाली परंपरा आहे. या भाषेत विपुल प्रमाणात विविध प्रकारचे साहित्य निर्माण झाले आहे आणि आजही होत आहे. त्यामुळे आधुनिक काळातही संस्कृतकवी आणि संस्कृत साहित्य प्रकारांची संख्या वृद्धिंगत होत आहे. एका बाजूला संस्कृत नियतकालिके, संस्कृत वर्तमानपत्रे, संस्कृत प्रचारप्रसारासाठी कार्य करणाऱ्या संस्था, तर दुसऱ्या बाजूला अनेक कवी या भाषेत कविता, नाटके, कथा, कादंबरी, चरित्रे, महाकाव्ये, खंडकाव्ये इत्यादींची निर्मिती करून संस्कृत अखंडित प्रवाहित व विकसित होणारी भाषा आहे, हे सिद्ध करीत आहेत. या कवींपैकीच एक कवी आहेत पं. मिथिलेश शर्मा. संशोधक प्रस्तुत कवी आणि कवीचे आधुनिक संस्कृत साहित्य प्रकारातील योगदान येथे दिग्दर्शित करीत आहे.

**उद्दिष्टे:**

- पं. मिथिलेश शर्मा यांचा सामान्य परिचय देणे.
- पं. मिथिलेश शर्मा यांच्या संस्कृत साहित्याचा थोडक्यात परिचय करून देणे.
- पं. मिथिलेश शर्मा यांचे आधुनिक संस्कृत साहित्य प्रकारातील योगदान स्पष्ट करणे

**व्याप्ती:** प्रस्तुत विषयाची व्याप्ती पं. मिथिलेश शर्मा यांच्या दहा साहित्य कृतींपुरतीच मर्यादित आहे.

**महत्व:** पं. मिथिलेश शर्मा हे आधुनिक युगातील प्रतिभाशाली विद्वान, संशोधक व संस्कृतकवी आहेत. त्यांनी विविध प्रकारचे संस्कृत साहित्य निर्माण केलेले आहे. परंतु ते व त्यांचे साहित्य संस्कृत अभ्यासकांपासून दुर्लक्षित राहिलेले आहे. पं. मिथिलेश शर्मा आणि त्यांचे संस्कृत साहित्य अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वाचा दस्तावेज आहे.

म्हणून कवी आणि त्यांचे साहित्य अभ्यासकांपर्यंत पोहोचावे आणि त्यांचा परिचय व्हावा. अभ्यासकांना प्रस्तुत कवीची भूमिका आणि त्यांचे आधुनिक संस्कृत साहित्य प्रकारातील योगदान ज्ञात व्हावे. त्यांचे साहित्य अभ्यासकांसाठी संदर्भसाधन ठरावे. यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत विषयाची संशोधनपद्धती वर्णनात्मक, विवेचनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

जन्म- पं. मिथिलेश शर्मा यांचा जन्म हरियाणा प्रदेशातील भिवानी जिल्ह्यातील पुर या गावी १ मार्च, १९६० मध्ये झाला. कुटुंब- त्यांच्या वडिलांचे नाव पं. श्री. ब्रजलाल शास्त्री आणि आईचे नाव श्रीमती अंचीदेवी असे होते. त्यांना चार बंधू होते. शिक्षण- त्यांचे शिक्षण एम. ए. (हिंदी, संस्कृत) पीएच. डी. ( मानद पदवी) असे आहे . व्यवसाय- त्यांनी ६ जुलै, १९८१ पासून २९ फ़ेब्रुवारी, २०२० पर्यंत संस्कृत अध्यापक तसेच प्राध्यापक म्हणून राजकीय उच्च एवं वरिष्ठ माध्यमिक विद्यालयांत संस्कृत अध्यापनाचे कार्य केले आहे. छंद आणि आवड- संस्कृतभाषेचे अध्ययन, अध्यापन आणि लेखन. कन्यासेवा, रक्तदान, गौसेवा, जलसेवा, प्राणीसेवा, वृक्षसेवा, परिवारनियोजन इ. विषयावरील संस्कृतभाषेतील स्पर्धांचे आयोजन. सन्मान व पुरस्कार - डॉ. मिथिलेश शर्मा यांना विविध पुरस्कार व सन्मानांनी गौरविण्यात आलेले आहे. वर्ष १९८३ तथा २००२ मध्ये जिल्हा शिक्षणाधिकारी, हिसारद्वारा "आदर्श शिक्षक" सम्मान. वर्ष २००८ मध्ये हरियाणा संस्कृत अकादमीद्वारा विद्यालय संस्कृतसेवा सम्मान.५ सप्टेबर, २००८ मध्ये हरियाणा सरकारद्वारा राज्य शिक्षक पुरस्कार. वर्ष २००८ मध्ये जिज्ञासामंच हिसारद्वारा आदर्श शिक्षक पुरस्कार.वर्ष २०१२ मध्ये 'हरियाणा संस्कृत अकादमी' पंचकूलाद्वारा 'पुस्तक सम्मान २०१४ मध्ये कवि बाणभट्ट सम्मान तसेच २०१५ चा पुस्तक सम्मान.वर्ष २०१५ मध्ये भारतीय संस्कृत विकास परिषद अमृतसरद्वारा संस्कृत संस्कृति गौरव सम्मान. वर्ष २०१६ मध्ये विक्रमशिला हिंदी विद्यापीठ (भागलपुर) द्वारा विद्यावाचस्पती उपाधीने सम्मानित. वर्ष २०१६ मध्ये अखिल भारतीय विद्वत् परिषद्, काशीद्वारा 'विद्वत् भूषण' सम्मान.२०१८ मध्ये आचार्य स्थाणुदत्त सम्मान.वर्ष २०१८ मध्ये राह फाउंडेशन ग्रुप हरियाणा द्वारा आऊटस्टेडिंग एचिवमेन्ट सम्मान.२०१९ मध्ये कुलपति दीनबन्धु छोटूराम प्रविधि विश्वविद्यालय, मुरथल , सोनिपत द्वारा साहित्य सेवा सम्मान. लेखनप्रेरणा - पं. मिथिलेश शर्मा यांना संस्कृत लेखनाची प्रेरणा घरातूनच मिळाली. लेखन -दैनिक जागरण, दैनिक भास्कर, पाठक पक्ष, नभछोर नैतिकलेख प्रकाशित. हरिप्रभा, हरियाणा, श्यामला, संभाषणसंदेश या पत्रिकांतून तसेच दैनिक समाचारपत्रांतून चरित्र, लघुकथा, लेख, नाटक, शोधनिबंध, श्लोक इ. लेखन.

१) प्रकाशित साहित्य-

अनुवाद साहित्य- कुमार्यम्बा (एकादशैकांकिकासञ्चय:) (संस्कृता- नुवादरचना), पं. दीनदयाल उपाध्यायचरितम् (गद्यकृति) शौर्यगाथा (अमरहुतात्मन: ऊधमसिंहस्य) खंडकाव्यम्- स्वामिधर्मदेवचरित्रम्।ललितसाहित्य-स्वातंत्र्यसेनानीगाथा(हिसार, भिवानी, सिरसा, फतेहाबाद) सुभाषितसंग्रह - सुवचांसि (पद्यविधा) भाग-१, सुवचांसि (पद्यपराग) भाग-२ सुवचांसि (सूक्तिमौक्तिकम्) भाग-३.

२) अप्रकाशित साहित्य –

१) रुबाईयाँ- वसंततिलका (मधुशाला-) २) पद्ममुनिचरितम् ३) संस्मरण- अद्वितीय दिव्यांग नारी१

**प्रकाशित साहित्यपरिचय –**

कुमार्यम्बा (संस्कृत अनुवादित एकांकिका)(एकांकिका म्हणजे एक अंकी नाटक. उत्कृष्ट एकसंघ व एकजिनसी परिणाम साधणारा संपूर्ण, स्वयंपूर्ण, एक अंकी नाट्यप्रकार म्हणजे एकांकिका.)२

साहित्य मानवी जीवनाचा आरसा आहे. लौकिक संस्कृतात महर्षी वाल्मिकी- पासून बाणभट्टापर्यंत कवीची मोठी परंपरा चालत आलेली आहे. त्यांच्या काव्यरचना वैदर्भी, गौडी, पांचाली रीतींत बद्ध आहेत. त्यामुळे सामान्यलोकांना कधी कधी सहज आकलन होत नाहीत. लोकमंगलकारी साहित्य लोकांना सहज आकलनक्षम असावे, असे म्हटले जाते. त्यामुळे आज सरल संस्कृतमध्ये साहित्यकृतींची निर्मिती व्हावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असते. संस्कृत भाषेचा प्रचारा-प्रसारसाठीदेखील हे योग्यच आहे. हे लक्षात घेऊन पं. मिथीलेश शर्मा यांनी अकरा हिंदी एकांकिकांचा संस्कृत अनुवाद करुन एक एकांकिकासंग्रह कुमार्यम्बा या नावाने प्रकाशित केला आहे.

कुमारी अम्बा २) आरोपय पादपमारोपय ३) पादयोश्चित्राणि ४) महानायकः ५)चायम् ६) नवनीतस्तेयम् ७) जनताधुनाजागरिष्यति ८) अधौत- हंडिका

९) मनसुखलीला प्रहसनम् १०) परीक्षा ११) पश्चातापः ३

वरील ११ एकांकिकांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, कवी भावानुवादकार्यात निपुण आहे. कारण इतर साहित्यप्रकारांच्या अनुवादापेक्षा नाटकाचा अनुवाद करणे तसे कठीणच असते. त्यामुळे पात्रांचे भावानुरूप भाषेत रूपांतर केलेले पहावयास मिळते.

सर्व अनुवादासाठी निवडलेल्या एकांकिका समस्याप्रधान आहेत. सामाजिक, पर्यावरणीय, कौटुंबिक, राजकीय समस्या मांडणाऱ्या आहेत. प्राचीनता व नाविन्य यांचा समन्वय साधणाऱ्या आहेत. भाषा-भाव-दृश्य, साजसज्जा इत्यादी नाट्यतत्त्वा- नुसार रंगमंचावर सादर करण्यासारख्या अशा आहे. सरल संस्कृतमध्ये अनुवादित केलेल्या आहेत. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे युवापिढी संवेदनशीलतेपेक्षा बुद्धि- वादी झालेली आहे, हे त्यातून सूचित होते. प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, विवेक ह्या जीवनमूल्यांचा ऱ्हास होत आहे, हेही या एकांकिकांतून सूचित केले आहे. जीवनमूल्यांची जपणूक करणे आपले कर्तव्य आहे, हाही संदेश दिलेला आहे.

**माला** - विरम, कृष्ण! विरम, मम विकारः परिच्छेदातीतः तदपितत्सर्वं श्रावयामि यद्भूतम्!

अकस्मादेकदा मदीया भगिन्याः प्रेमी युवकः एकस्यां बसयानदुर्घटनायां पंचत्वं गतःi तदानीं मम भगिनीगर्भिणी आसीत्i कालस्य कुटिलागतिःi सापि यथाकालं राधां प्रसूय प्रसववेदनापीडाम् असहमाना दिवंगताi४

२) चरित्र- पं. दीनदयाल उपाध्यायचरितम् (एखाद्या विशिष्ट म्हणजे आगळे जीवन जगलेल्या व्यक्तीच्या जीवनातील घटनांचे कालानुक्रमे निवेदन करीत असता व्यक्तिजीवनाचा व त्या व्यक्तिमत्त्वाचा साकल्याने जीवंत प्रत्यय देणाऱ्या लेखनाला चरित्र म्हणता येईल.)५ इ.स. १९९९ मध्ये कारगिल युद्धात शहीद झालेले लघुसैन्यदलाचे नायक श्री. सिद्धकाम शर्मा हे पं. मिथिलेश शर्म यांचे ज्येष्ठ बंधू होते. कवीचे वडील स्वातंत्र्य सेनानी होते. त्यामुळे त्यांच्या रक्तात देशभक्ती भिनलेली आहे. या कारणाने कवीची देशभक्तांचे जीवनचरित्र वाचन-लेखनामधील रुची वृद्धिंगत होत गेली. त्यामुळे कवीने स्वतःसाठी थोडे आणि देशासाठी सर्वस्व हे लक्ष्य धारण करणाऱ्या पं. दीनदयाल उपाध्यायांचे चरित्र संस्कृतमध्ये रचले.

इतर भाषांमध्ये अनेक महापुरुषांची जीवनचरित्रे लिहिलेली आपणास पहावयास मिळतील, परंतु संस्कृतमध्ये क्वचितच एखाद्या महापुरुषाचे जीवनचरित्र लिहलेले पहावयास मिळते. त्याची पूर्ती करण्यासाठी पं. मिथिलेश शर्मा प्रयत्नशील असलेले दिसतात. या पुस्तकामध्ये पं. दीनदयाल उपाध्यायांचे संघर्षपूर्ण जीवन मंगला-चरणपासून महाप्रयाणापर्यंत २९ विभागात विभागून सरल, सुबोध संस्कृत भाषेत लिहिले आहे आणि त्याचा हिंदी अनुवाद अत्यंत सोप्या भाषेत केलेला आहे.

विश्वज्ञानाधारे अद्यतनीय निज परम्पराधारे च एतादृशं भारतवर्षं रचयिष्यामः येन अस्माकं भारतदेशः

गौरवपूर्णो भविष्यतिı यत्र लब्धजन्मा जनः निजव्यक्तित्वं विकासयन् मानवेन सहैव न अपितु सृष्ट्या सह एकात्मवादं स्थापयित्वा नरात नारायणो भवितुं समर्थो भविष्यतिı ६

३) शौर्यगाथा (अमरहुतात्मनः ऊधमसिंहस्य) ( पराक्रमाची स्तुती)

संपूर्ण विश्वात प्रत्येकजण स्वतःच्या मातृभूमीला आणि स्वदेशाला नमस्कार करीत असतो, त्याच्यापुढे नतमस्तक होत असतो. सर्वश्रेष्ठ मानत असतो. हीच राष्ट्रीयभावना मानवाला स्वदेशोन्नत्तीसाठी प्रेरणा देत असते. स्वदेशाभिमान, स्वदेशगौरव प्राणांपेक्षा अधिक प्रिय मानला जातो. देशभक्तीभावनेनेच प्रेरित झालेले हजारो वीर समरांगणांत स्वेच्छेने स्वतःचे जीवन समर्पित करतात. त्यांच्या प्रेरणेतूनच लोकांमध्ये देशोन्नतीभावना, समाजसुधारभावना, समाजोन्नत्तीभावना, समाजोन्नती कामना दृढ होत असते. याच भावनेने कवीने शौर्यगाथा (अमरहुतात्मनः ऊधम-सिंहस्य) हा ग्रंथ रचलेला आहे. हा ग्रंथ सहा सोपानांमध्ये विभागलेला आहे.

वरील ग्रंथाचा अभ्यास केला असता, असे ज्ञात होते की, कवीने ऊधमसिंहची शौर्यगाथा लिहण्याचा सफल प्रयत्न केलेला आहे. ही शौर्यगाथा सरल आणि सुबोध संस्कृतभाषेत रचलेली आहे. संस्कृत अभ्यासकांच्या अभ्यासात या पुस्तकाने नवीन साहित्यप्रकाराचा समावेश केलेला आहे.

संस्कृत भाषा न जाणणारे वाचकदेखील हिंदीभाषेच्या अनुवादामुळे अमरहुतात्मा ऊधमसिंहाचे समर्पण आणि देशप्रेम चांगल्या प्रकारे जाणून घेऊ शकतील. "न्यायाधिकारि महोदय! भवन्तो भारतीयाः सन्ति" तदपि भवन्तः किं भारतीयानां चरित्र नाभिजानन्ति? भवतां व्यवहारं दृष्ट्वा मे मनः दुखायतेı किं भवद्भिः महाराणाप्रताप इति राज्ञः त्यागतपस्या विषये किमपि न पठितं वा श्रुतम् ? किं भवान् आमूलतः दशमेशपितुः गुरुगोविन्दसिंहस्य पुत्राणां परबलिदानं विस्मृतवान्? तैः शावकैः स्वदेशरक्षार्थं स्वधर्मरक्षणाय च आत्मनः .बलिदानं कृतम्ı तेषां न्यायमार्गमनुचराम्यहम्ı तैः आदर्शः प्रस्तुतः यत् पराधीनतायाः शतवर्षात् स्वाधीनतायाः वर्षमेकं श्रेयस्करं श्रेष्ठतमं चापिı७ ४) खंडकाव्यम्- स्वामिधर्मदेवचरितम् (जिथे एखादाच प्रसंग वा एखादीच भावना अधिक उत्कटतेने ,तन्मयतेने रंगविलेली असते. त्याला खंडकाव्य म्हणतात.)८

पं. मिथिलेश शर्मा यांनी स्वामिधर्मदेवचरितम् हे एक खंडकाव्य लिहलेले आहे. यात पाच सर्ग आहेत. पाच सर्गात ३९० श्लोक अनुष्टुप छंदात रचलेले आहेत. या श्लोकांचा हिंदी अनुवादही केलेला आहे.या काव्याचे नायक पटौदी येथील आश्रमहरिमंदिर संस्कृत महाविद्यालयाचे अधिष्ठाता परमादरणीय स्वामीश्रीधर्मदेव महाराज आहेत. ज्यांच्या नावाने हरियाणा संस्कृत अकादमी पंचकुलाद्वारे स्वामीधर्मदेवसंस्कृतसमाराधक पुरस्कार दिला जातो.

या ग्रंथाचा अभ्यास केला असता असे ज्ञात होते की, या पुस्तकात लेखकाने थोडक्यात गुरुशिष्य परंपरामहत्व, धर्मतत्त्व, निसर्गचित्रण, संस्कृतवर्णन, गोसेवामहत्त्व, राष्ट्र सेवेतील साधूंचे महत्त्व इत्यादी विषयांचे विवेचन अत्यंत सूक्ष्मरीतीने थोडक्यात केलेले आहे. तसेच स्वामीश्रीधर्मदेव यांच्या जीवनचरित्राच्या माध्यमातून मनुष्याने मोहरूपी रात्रीपासून जागृत होऊन संसाराची वास्तविकता आणि आत्मस्वरूप जाणण्याचा प्रयत्न करावा, असा संदेश दिलेला आहे. कवीने आजच्या स्थितीला अनुसरून खंडकाव्यातील श्लोकांची रचना सुगम,सुबोध, सरल संस्कृतभाषेत केलेली आहे. ज्यामुळे संस्कृतचे जुजबी ज्ञान असणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि अभ्यासकांना त्याचा लाभ होईल.

कठिनमस्ति कार्यं हि, संस्थाशिक्षणचालनम्!
हरिमंदिरसंस्था हि, लोकोपकारिणी सदा॥

नदीषु च यथा गंगा, पर्वतेषु हिमालयः
यथा लिंगेषु केदारो, गेहेषु हरिमंदिरम्॥
गुरुकुलीय शिक्षा या, सुसंस्कारयुता सदा
ज्येष्ठा श्रेष्ठा तथा मन्ये समेषामुपकारिणी॥९

ललितसाहित्य - स्वातंत्र्यसेनानीगाथा (हिसार, भिवानी, सिरसा, फतेहाबाद)

(ललितसाहित्य म्हणजे एकाचप्रकारचे कुठल्याही विषया- वरचे मुक्तचिंतन ज्यात भाषिक शैली महत्त्वाची ठरते.)१० प्रस्तुत पुस्तकात भारतीयस्वातंत्र्यसंग्रामात सर्वस्व अर्पण करणाऱ्या हरियाणा प्रदेशातील २१ देशभक्तांच्या संघर्षमय जीवनाचे विवेचन केलेले आहे. इतर भाषांमध्ये स्वातंत्र्यसेनानी यांचा जीवनपरिचय सापडतो पण संस्कृतभाषेत अशाप्रकारचा पहिलाच प्रयत्न आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. भाषाशैली अत्यंत सरल, सरस, बालसुलभ आणि ललित अशी आहे. सुभाषितसंग्रह- सुवचांसि (पद्यविधा-श्लोक-३५०) भाग-१, सुवचांसि (पद्यपराग-श्लोक-३२०) भाग-१ सुवचांसि (सूक्तिमौक्तिकम्-श्लोक-२२९) भाग-३.

मनातील भाव व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे काव्य होय. कवीने प्राचीन परंपरेला अनुसरून मातृवृक्षसमयसंसर्गसंबंधमहत्त्व, प्रज्ञा- लीला (प्रहेलिका), देशभक्त, कोविड-२०१९, खलस्वभाव, सत्पुरुष, पक्ष्यांचे जीवन, वसंततिलका,शिखरिणी छंद, पितापुत्र, स्वरकोकिला, आदरांजली दीपावली, होलिका, इत्यादी विवध प्रचलित आणि आधुनिक विषयांचा समन्वय साधत वरील तीन सुवचांसि पुस्तकांची अनुष्टुप् छंदात निर्मिती केलेली आहे. सर्व सुभाषिते बोधप्रद, सरल, सोपी, आकलनीय अशीच आहेत. आपल्या ज्ञानात भर घालणारी आहेत.

संक्रमणश्च संस्कारश्चोभौ संचारिणौ सदा।
सभ्यंकरोति संस्कारः चासभ्यं कुरुतेऽपरः
सदा द्वारेषु तिष्ठामि, गृहरक्षी दिवानिशम्।
प्राणिषु नहि मे संज्ञा, स्वामिना मोक्षबन्धनम्॥११

अप्रकाशित साहित्य -

रुबाईयाँ - वसंततिलका (मधुशाला- संस्कृतानुवाद) (उर्दू साहित्य में चार पंक्तियो की उस कविता को रुबाई कहते हैं जिनमें एक ही एक विचार प्रकट किया गया हो।)१२

नित्यं सृजामि मधुकल्पविचारमद्यम्,
चाहं भरामि मधुना निजमात्मतत्त्वं।
धृत्वा पिबामि मृदुहस्तशरावकल्पम्,
शालासुरापि च विभक्तधयस्तथाहम्।
मधुर भावनाओं की सुमधुर
नित्य बनता हुं हाला
भरता हुं इस मधु से
अपने अन्तर का प्याला प्याला
उठा कल्पना के हाथों से
स्वयं इसे पी जाता हुं
अपने ही हुं मैं साकी

पीने वाला, मधुशाला॥१३

२) पद्ममुनिचरितम्

३) संस्मरण- अद्वितीय दिव्यांग नारी

**निष्कर्ष:**

वरील विवेचनावरून असे ज्ञात होते की, पं. मिथिलेश शर्मा हे प्रतिभाशाली विद्वान आणि आधुनिक कवी आहेत. यांना संस्कृत साहित्य लेखनाची प्रेरणा घरातूनच मिळालेली आहे. विविधप्रकारच्या गुणवत्तापूर्ण व दर्जेदार संस्कृत साहित्यनिर्मितीमुळे त्यांना विविध पुरस्कारसन्मानांनी गौरविण्यात आलेले आहे. त्यांनी कुमार्यम्बा (संस्कृतानुवादित-एकादशैकांकिकासंग्रह:) ,पं.दीनदयाल उपाध्यायचरितम् (गद्यकृति), स्वातंत्र्यसेनानीगाथा (गद्यकृति), शौर्यगाथा (अमरहुतात्मन: ऊधमसिंहस्य), (गद्यकृति), स्वामिधर्मदेवचरितम् (खंडकाव्यम्), सुवचांसि-भाग-१,२,३, वसंततिलका (मधुशाला-रुबाईयाँ), पद्ममुनिचरितम् इत्यादी विविधप्रकारच्या दहा आधुनिक संस्कृत साहित्यकृतींची सरल, सुबोध, सोप्या संस्कृतभाषेत निर्मिती केलेली आहे. समाजाला आधुनिक लेखन प्रेरणा दिलेली आहे. कवीने आपल्या लिखाणातून एकीकडे सत्य आणि सुखद परिणामांना अधोरेखित केले आहे तर, दुसरीकडे असत्याचा दु:खद शेवट होतो, ही शिकवण सुभाषितसंग्रहातून दिलेली आहे. चांगले साहित्य व्यक्ती आणि त्याच्या चारित्र्यनिर्मितीसाठी सहाय्यक असते. म्हणूनच समाजाच्या नवनिर्मितीसाठी साहित्याची महत्त्वाची भूमिका आहे. समाजाला योग्य दिशा देण्यासाठी, सुसंस्कारित करण्यासाठी, जीवनमूल्यांची शिकवण देण्यासाठी, भूतकाळापासून प्रेरणा घेण्यासाठी, वर्तमान चित्रित करण्यासाठी, भविष्याला मार्गदर्शन करण्यासाठी आधुनिक संस्कृत साहित्य सहाय्यक ठरत आहे. म्हणून पं. मिथिलेश शर्मा यांचे आधुनिक संस्कृत साहित्यप्रकारनिर्मितीतील योगदान अत्यंत महत्त्वाचे आणि मोलाचे आहे.

**संदर्भ सूची**:


१. सुवचांसि भाग -२, मलपृष्ठ

२. कुमार्यम्बा, पान नं. ०१ ते २३४

३. तत्रैव, पान नं. १४

४. https://ir.unishivaji.ac.in, पान नं. ७०

५. पं. दीनदयाल उपाध्यायचरितम्, पान नं. १७४

६. शौर्यगाथा, पान नं. ११४, ११५

७. ललित संस्कृत साहित्याला महाराष्ट्राचे योगदान, पान नं.३२

८. स्वामिधर्मदेवचरितम्, पान नं. १६ ,श्लोक-५०, पान नं. १७, श्लोक- ५१, ५२

९. प्रथम वर्ष कला मराठी अनिवार्य, पान नं. ०५

१०. सुवचांसि भाग -२, पान नं. ६८, श्लो-२४२, पान नं. ८४, श्लोक-४०

११. https://hi.m.wikipedia.org

१२. शर्मा मिथिलेश, मोबाईल संभाषण.


**संदर्भ ग्रंथ सूची**:


१. कांबळे दौलतराव, प्रथम वर्ष कला मराठी अनिवार्य,प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

२. द्विवेदी कपिलदेव,संस्कृत साहित्य का समीक्षात्मक इतिहास, रामनारायण विजयकुमार, इलाहाबाद २०१४
३. मराठे हंसश्री, ललित संस्कृत साहित्याला महाराष्ट्राचे योगदान, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००६, प्रथमावृत्ती
४. वर्णेकर श्री. भा., अर्वाचीन संस्कृत साहित्य, मॉडर्न बूक, स्टोअर्स, नागपूर, १९६३
५. शर्मा मिथिलेश, कुमार्यम्बा, विकास प्रिंट्स एन्ड ग्राफिक्स, हिसार, प्रथमावृत्ती, २०१५
६. शर्मा मिथिलेश, पं. दीनदयाल उपाध्यायचरितम्, अर्थ विजन पब्लिकेशन्स, गुडगाव-
७. १२२००२ , हरियाणा, प्रथमावृत्ती, २०१६
८. शर्मा मिथिलेश, शौर्यगाथा (अमरहुतात्मनः ऊधमसिंहस्य), हिसार फोटोस्टेट, हिसार, १२५००१ प्रथमावृत्ती,२०१७
९. शर्मा मिथिलेश, स्वामिधर्मदेवचरितम्, हिसार फोटोस्टेट, हिसार, १२५००१
१०. प्रथमावृत्ती,२०१८
११. शर्मा मिथिलेश, सुवचांसि भाग-१, ज्यास प्रिन्टर्स, हिसार
१२. शर्मा मिथिलेश, सुवचांसि भाग-२, ज्यास प्रिन्टर्स, हिसार
१३. शर्मा मिथिलेश, सुवचांसि भाग-३, ज्यास प्रिन्टर्स, हिसार
१४. शर्मा मिथिलेश, स्वातन्त्र्यसेनानीगाथा, डोरेक्स ओफ़सैट प्रिंटर्स, हिसार